# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./१३५६ /२०२०

दि. २३/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय:- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव/प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय.**

संदर्भ:- १) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना२०२०/प्र. क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १४ मार्च, २०२०
२) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण - २०२०/स.क्र.११४/२०/विशि-१ दिनांक १४ मार्च, २०२०
३) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दिनांक १४ मार्च, २०२०
४) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. उशिनाग/आस्था/सर्व महा/१४३४/२०२०, दिनांक १४ मार्च, २०२०
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे पत्र क्र. करोना२०२०/प्र. क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १५ मार्च, २०२०
६) शासन पत्र क्र. संकीर्ण २०२०/(सं.क्र)/(११४/२०)/विशि-१, दिनांक १६ मार्च, २०२०
७) संचालनालयाचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७८७, दिनांक १६ मार्च, २०२०
८) शासन पत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१, दिनांक १६ मार्च, २०२०
९) संचालनालयाचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९ , दिनांक १६ मार्च, २०२०
१०) Do.No.Secy(HE)/MHRD/२०२० New Delhi Dated २१st March, २०२०

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग व प्रशासकीय विभागाकरीता संदर्भांकित क्र. १ ते ९ अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत व उपरोक्त परिपत्रकातील सुचनांचे, निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखील सुचित केले आहे.

संदर्भिय पत्र क्र. १० अन्वये प्राप्त दिशानिर्देशानुसार कोरोना विषाणूचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी व देशभरातील शिक्षण संस्थामध्ये शिक्षक/संशोधक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना अंकीत केल्या आहेत. उपरोक्त संदर्भाधिन पत्र क्र. १० च्या अनुषंगाने विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभाग/शैक्षणिक विभाग यांना सुचित करण्यात येते की, शिक्षक/संशोधक/अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपले घरी राहून (Work from Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे.

तसेच शिक्षक व संशोधकांनी हा काळ Online Content विकसित करणे, Online अध्यापन व Online मुल्यामापनाकरीता उपयोगात आणावा. तद्वतच पुढील सत्र/शैक्षणिक वर्षाकरीता शैक्षणिक साहित्य तयार करणे, संशोधन लेख, संशोधन निबंध व संशोधनासंदर्भात इतर आवश्यक कार्यवाही करावी. या शिवाय नाविण्यपुर्ण प्रश्नसंचयनी (Question Bank) व 'एक भारत श्रेष्ठ भारत' व इतर महत्वाच्या विषयावर नाविण्यपुर्ण प्रकल्प तयार करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

आपतकालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित विभाग प्रमुखांकडे सादर करावे. अत्यावश्यक सेवा (सुरक्षा विभाग, संगणक विभाग, अभियांत्रिकी विभाग, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

कोरोना विषाणू संदर्भात उपाययोजना करण्यासाठी देशभर प्रयत्न होत आहेत. या पार्श्वभुमीवर विद्यापीठ परिसर येत्या २७ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश मा. कुलगुरू यांनी दिले असून उपरोक्त नमुद अत्यावश्यक सेवा विभाग तसेच मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, आवक जावक विभाग एका कर्मचाऱ्यासह सुरू राहतील. या काळात सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यालय न सोडता घरी बसूनच आवश्यक असेल ते प्रशासकीय काम करावे असेही निर्देश मा. कुलगुरूंनी दिलेले आहेत. तसेच उपरोक्त सुचनांचे अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये यांनी त्यांच्या महाविद्यालयाकरीता योग्य निर्देश त्यांच्या स्तरावरून निर्गमित करावे. असे निर्देश आहेत.

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
५. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६. विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख, यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
७. विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय विभाग/युनिट प्रमुख यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.